महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. :औसंवि/ब/ककनिस/५६वी बैठक/ 023089 दिनांक : 17 AUG 2013

## परिपत्रक

विषय : म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५६ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

***********

दि. २८/०६/२०१३ रोजी म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीची ५६ वी बैठक प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे देण्यात येणाऱ्या कर्मचारी अवलंबितांकरिता असणाऱ्या आजाराच्या वैद्यकीय आर्थिक मदतीसाठी कर्मचाऱ्याकडून जे सद्याचे विहीत नमुन्यातील प्रपत्र भरुन घेण्यात येते त्यामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. (सोबत नमुना प्रपत्र जोडले आहे) **कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना द्यावयाच्या आर्थिक मदतीच्या प्रकरणी कर्मचाऱ्याने यापुढे सदर प्रपत्रामध्येच माहिती भरुन सदर प्रपत्र लेखापरिक्षण (Audit) करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.**

२) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना ४ प्रमुख आजारांकरिता **१)** मेंदूच्या गाठीची शस्त्रक्रिया (Brain Tumor Surgery) **२)** कर्करोग (Cancer) **३)** गंभीर अस्थीरोग शस्त्रक्रिया (Major Orthopedic Surgery) **४)** हृदय शस्त्रक्रिया (Open Heart Surgery) आजारांच्या उपचार / शस्त्रक्रियेसाठीच्या आर्थिक मदतीमध्येही रु. २०,०००/- वरुन रु. ४०,०००/- अशी वाढ करण्यात आली आहे.

३) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमधील आजार क्र. १७ म्हणजे (Female Gyanac Operation / Cesarean Delivery) साठी रु. १०,०००/- ऐवजी रु. १५,०००/- ऐवढी आर्थिक मदत देण्यात येईल.

४) परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/ककनिस/५२वी बैठक/३२८८६, दि. ०२/११/२०११ मधील मुद्दा क्र. २१ मध्ये "कर्मचाऱ्यास कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास जिल्हा शल्य चिकित्सकांच्या दाखल्याच्या आधारे त्यांना रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी." अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर विषयाबाबत असा निर्णय घेण्यात आला की, **"मुळ परिपत्रकातील सुचनांच्या अधिन राहून, परिपत्रक प्रसारीत झालेल्या तारखेनंतरच कायमस्वरुपी अपंगत्व आलेले कर्मचारी सदर योजनेच्या लाभास पात्र राहतील."**

५) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधुन कर्मचारी पाल्यांना शिष्यवृत्ती देताना, इच्छीत ठिकाणी प्रवेश मिळण्यासाठी पाल्याने शैक्षणिक खंड (Gap) घेतल्यास अशा प्रकरणामध्ये शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवणेकरिता जास्तीत जास्त दोन वर्ष शैक्षणिक खंड ग्राह्य धरण्यात येऊन कर्मचारी पाल्यास शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवता येईल. परंतु सदर शैक्षणिक खंड शिष्यवृत्तीच्या संपूर्ण

कालावधीमध्ये म्हणजेच पदवी परीक्षा पूर्ण होईपर्यंत फक्त एकदाच घेता येईल. शैक्षणिक खंड दोन वर्षापेक्षा जास्त असल्यास शिष्यवृत्ती कायमस्वरुपी बंद करण्यात येईल.

६) म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या माध्यमातून सन २०१३-१४ च्या आंतर कंपनी क्रीडास्पर्धा या महानिर्मिती कंपनीच्या वतीने नोंव्हेबर -२०१३ अखेर पर्यंत घेण्यात याव्यात. तसेच आंतर कंपनी नाट्यस्पर्धा महापारेषण कंपनीने माहे नोव्हेंबर -२०१३ अखेर पर्यंत आयोजित कराव्यात.

तसेच आंतर कंपनी क्रीडा व नाट्य स्पर्धासाठी म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात यावे.

वरील अनुक्रमांक १ ते ३ मध्ये नमूद सुधारीत तरतुदीच्या अमलबजावणीचा निर्णय परिपत्रक प्रसारीत झाल्याच्या तारखेपासून अमलात येईल. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी द्यावी.

सरद परिपत्रक महावितरण कंपनीच्या Intranet या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

किशोर पवार

(किशोर पवार)

सोबत : वरीलप्रमाणे.

सदस्य / सचिव, म.रा.वि.मं. क.क.नि.स.तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), महावितरण.
३) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण.

**प्रत सस्नेह :**

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण.

- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त परिपत्रक प्रसारीत करण्याची कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

**प्रत :**

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

**म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्याच्या अवलंबिताला देण्यात येणाऱ्या वैद्यकीय आर्थिक मदतीसाठीचे विहीत नमुन्यातील प्रपत्र**

(म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी अंतर्गत महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्याअवलंबिताना देण्यात येणाऱ्या वैद्यकीय आर्थिक मदतीसाठी कर्मचाऱ्याने भरावयाची माहिती)

१) कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व भ.नि.नि. क्र. :

२) कर्मचाऱ्याचा भ्रमणध्वनी क्र. :

३) कंपनीच्या सेवेत रुजू झाल्याची तारीख :

४) कामकरीत असलेल्या कार्यालयाचे नांव :

५) अवलंबिताचे नांव व जन्मतारीख (वय) :

६) अवलंबिताचे कर्मचाऱ्याशी असलेले नाते :

७) अवलंबित कर्मचाऱ्यावर अवलंबून आहे किंवा नाही ? :

८) अ) अवलंबिताला केंद्र / राज्यसरकारची अथवा खाजगी पेन्शन किंवा इतर कुठलेही उत्पन्न मिळते का ? मिळत असल्यास त्याचा तपशील. :

ब) निवृत्ती वेतन योजना १९९५ अंतर्गत निवृत्ती वेतन (पेंन्शन) मिळते का ?

क) निवृत्ती वेतन योजना १९९५ अंतर्गत कुटुंब वेतन मिळते का ?

९) अवलंबिताच्या आजाराचा प्रकार :

१०) आजारासाठी झालेला एकूण खर्च :

११) उपचार घेतलेल्या रुग्णालयाचे नांव :

१२) उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नांव व नोंदणी क्र. :

१३) प्रस्ताव कार्यालयाने लेखापरिक्षीत केला आहे काय ? :

१४) मी, श्री. / श्रीमती ---------------------------------- असे सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, उपरोक्त माहिती ही खरी असून श्री. / श्रीमती / कु. -------------------------------- हे माझ्यावर पुर्णपणे अवलंबित आहेत. तसेच त्यांना कुठलेही उत्पन्न मिळत नाही.

उपरोक्त माहिती खोटी आढळल्यास मी म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनी अंतर्गत विविध सेवाविनियमाच्या आधारे शिस्तभंग कारवाईसाठी पात्र राहीन व त्याबाबत माझी कुठलीही तक्रार राहणार नाही . त्यास पुर्णपणे मी जबाबदार राहीन.

कर्मचाऱ्याची सही

नियंत्रण अधिकाऱ्याची सही व शिक्का